**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

अधिवेशनाचा शुभारंभ "वंदे मातरम्" या गीताच्या समूह गायनाने झाला.

**पृ.शी.**: शोकप्रस्ताव

**मु.शी.**: मुंबई शहरातील झवेरी बाजार, ऑपेरा हाऊस, दादर या ठिकाणी झालेल्या बॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडलेल्या निरपराध व्यक्तिंच्या दु:खद निधनाबद्दल शोकप्रस्ताव.

**सभापती** : या सभागृहाचे नेते सन्माननीय उप मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते व गट नेते श्री. दिवाकर रावते यांच्या समवेत माझ्या दालनात आज सकाळी झालेल्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे आज सोमवार, दिनांक 25 जुलै, 2011 रोजीचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन दिनांक 13 जुलै, 2011 रोजी मुंबईतील बॉम्बस्फोटामध्ये मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तिंच्या दु:खद निधनाबद्दल शोकप्रस्ताव घेण्यात येईल. त्यानंतर सभापती तालिका नामनिर्देशित करण्यात येईल व आजच्या दिवसाची सभागृहाची बैठक स्थगित करण्यात येईल. आता मी सभागृहाच्या वतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"बुधवार, दिनांक 13 जुलै, 2011 रोजी सायंकाळी 6.54 च्या सुमारास मुंबई शहरातील इ ावेरी बाजार, ऑपेरा हाऊस, कबुतरखाना, दादर या मोक्याच्या ठिकाणी झालेल्या शक्तिशाली व भीषण बॉम्बस्फोटामध्ये अनेक निरपराध व्यक्ती मृत्युमुखी पडल्या तर अनेकजण जखमी झाले आहेत. सर्वांनी शोक व्यक्त करावा अशी ही दुर्घटना आहे. या भीषण बॉम्बस्फोटाने मुंबई शहर हादरुन गेले आहे. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या निरपराध व्यक्तींच्या कुटुंबियाना सावरण्यासाठी व जखमींना मदत देण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. या दहशतवादी कृत्यांचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करुन या शक्तिशाली व भीषण बॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडलेल्या अनेक निरपराध व्यक्तींच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते".

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : आदरणीय सभापती महोदय, बुधवार दिनांक 13 जुलै 2011 रोजी संध्याकाळी 06 वाजून 54 मिनिटांपासून 07 वाजून 05 मिनिटांपर्यंतच्या दरम्यान मुंबईतील झवेरी बाजार, ऑपेरा हाऊस आणि दादर येथील कबुतरखाना या महत्वाच्या ठिकाणी झालेल्या शक्तीशाली बॉम्ब स्फोटामध्ये मृत्युमुखी पडलेल्या निरपराध नागरिकांच्या दुःखद निधना-बद्दल आदरणीय सभापती महोदयांनी मांडलेल्या शोक प्रस्तावास अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या दुर्दैवी बॉम्बस्फोटामध्ये 24 जणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत आणि जवळपास 125 जण जखमी झालेले आहेत. अशा प्रकारे दहशतवादी हल्ल्यामध्ये ज्या निरपराध बांधवांचे मृत्यू झाले, बळी पडले त्याबद्दल मी सदनाचा नेता म्हणून तीव्र दुःख व्यक्त करीत आहे. या दुःखद प्रसंगी मृत्युमुखी पडलेल्या निरपराध बांधवाच्या कुटुंबीयांच्या बरोबर सर्व देश उभा आहे हा संदेश आपण सर्व जगाला दिलेला आहे. शासनाने मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना 5 लाख रुपये आणि जखमी व्यक्तींच्या कुटुंबीयांना 50 हजार रुपयांची मदत जाहीर केलेली आहे. तसेच जे लोक जखमी झालेले आहेत, त्यांच्या वैद्यकीय उपचाराची संपूर्ण जबाबदारी देखील शासनाने घेतलेली आहे. तसेच केंद्र शासनाने देखील या बाबत काही आर्थिक मदत केलेली आहे.आजपर्यंत आपल्यावर अनेक संकटे आली.त्यातील काही निसर्ग निर्मित होती तर काही मानव निर्मित होती आणि आपण या प्रत्येक संकटाला धैर्याने सामोरे गेलो आहोत. तसेच माणुसकीवर घाला घालणाऱ्या निष्ठूर प्रवृत्तींना माणुसकीचा गहिवर काय असतो हे आपण नेहमी दाखवून दिलेले आहे.

सभापती महोदय, दिनांक 13 जुलै 2011 रोजी झालेल्या बॉम्बस्फोटाच्या मालिकेने पुन्हा एकदा दहशतवादाने मान वर काढलेली आहे.स्वत:हून इतरांना त्रास न देण्याची आपली प्रवृत्ती नेहमीच पहावयास मिळते पण आपली ही प्रवृत्ती म्हणजे कमजोरी असल्याचा गैरसमज काही घटकांनी करुन घेतलेला दिसतो. त्यामुळेच त्यांचा असलेला हा गैरसमज दूर करुन त्यांना अद्दल घडविण्यासाठी आपल्याला कठोर पावले उचलावी लागणार आहेत.सामान्य नागरिकांना सुरक्षित वातावरणात निर्धोकपणे आपले जीवन जगता यावे अशीच प्रत्येक शासनकर्त्यांची भावना असते. पण काही असामाजिक तत्वांमुळे काही वेळेस नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करुन देण्यामध्ये अडचणी येतात आणि या अडचणीचा गैरफायदा दहशतवादी घेत असतात. पण त्यांना अशा प्रकारे किती वेळा गैरफायदा घेऊ द्यावयाचा याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. दहशतवाद्यांची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या देशाकडे वाईट नजरेने पहाण्याची हिंमत होणार नाही अशी त्यांना अद्दल घडविली पाहिजे. आपल्यावर हा जो कठीण प्रसंग आलेला आहे अशावेळी जात-पात, धर्म, पंथ या सर्व गोष्टी विसरुन माणुसकीच्या धर्माचे पालन करणाऱ्या सर्व लोकांना देखील धन्यवाद दिले पाहिजेत. बॉम्बस्फोटानंतर जखमी झालेल्या व्यक्तींना तात्काळ रुग्णालयामध्ये नेण्यासाठी शेकडो हात पुढे आले. तसेच अनेक रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले. त्याचप्रमाणे देवदूत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉक्टरांनी उच्च व्यवसायिक मूल्यांचे दर्शन घडविले.डॉक्टरांनी रात्रं-दिवस रुग्णालयामध्ये थांबून तातडीने शस्त्रक्रिया केल्या. तसेच तेथील नर्सेसनी देखील रुग्णांची शुश्रुषा केली. अशा प्रकारे डॉक्टर, पोलीस तसेच घटनास्थळी असणारे नागरीक अशा ज्ञात-अज्ञात सर्वांनी आपापल्यापरीने शक्य ती मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो. तसेच मुंबईकरांनी नेहमीप्रमाणे आपल्या धिरोदात्तपणाचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या या धीरोदात्तपणाला विनम्र अभिवादन करतो. मी या बॉम्बस्फोटामध्ये मृत्युमुखी पडलेल्या मृत व्यक्तींना आदरांजली अर्पण करतो आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खामध्ये आम्ही सर्वजण सहभागी आहोत असा त्यांना विश्वास देतो.

सभापती महोदय, या बॉम्बस्फोटामध्ये जे जखमी झालेले आहेत,त्यांच्या वैद्यकीय उपचाराची सर्व जबाबदारी शासनाने घेतलेली आहे. त्या सर्वांच्या प्रकृतीमध्ये लवकरात लवकर सुधारणा व्हावी यादृष्टीने आवश्यक ती सर्व काळजी घेण्यात येत आहे. तसेच सर्व जखमी व्यक्तींची प्रकृती लवकरात लवकर सुधारावी यासाठी देखील मी प्रार्थना करतो. या दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी आपण सर्वजण एकजुटीने प्रयत्न करु या अशा प्रकारचे आवाहनही करतो आणि माननीय सभापती महोदयांनी मांडलेल्या प्रस्तावास अनुमोदन देखील देतो.

-----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, दिनांक 13 जुलै, 2011 रोजी मुंबई शहरातील झवेरी बाजार, ऑपेरा हाऊस आणि दादर येथील कबुतरखाना या ठिकाणी झालेल्या बॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडलेल्या निरपराध व्यक्तींच्या दु:खद निधनाबद्दल आपण जो शोक प्रस्ताव सभागृहासमोर मांडलेला आहे त्याला मी पाठिंबा देतो.

सभापती महोदय, दिनांक 13 जुलै रोजी मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटाने मुंबईतील दैनंदिन जनजीवनाला पुन्हा एकदा तडे गेलेले आहेत. दादर येथील कबुतरखाना, व्यापाऱ्यांचा झवेरी बाजार आणि ऑपेरा हाऊस ही मुंबईतील महत्वाची ठिकाणे असून या महत्वाच्या ठिकाणी घुसून दहशतवाद्यांनी बॉम्ब पेरले आणि जीवंत माणसांच्या चिंधडया उडविल्या आहेत. या बॉम्बस्फोटातील जखमी व्यक्तींपैकी के.ई.एम. रुग्णालयात उपचार घेत असलेले 28 वर्षे वयाचे तरुण श्री. माणकेश्वर विश्वकर्मा यांचे आजच सकाळी निधन झालेले आहे. त्यामुळे या बॉम्बस्फोटातील मृतांची संख्या 23 वरुन 24 वर पोहचलेली आहे. या बॉम्बस्फोटात अनेक तरुण मुले मृत झाली असून जखमी झालेल्या अनेक व्यक्ती आजही उपचार घेत आहेत. या बॉम्बस्फोटात जवळपास 125 लोक जखमी झालेले आहेत. तसेच या व्यक्तींचा काही दोष नसताना त्यांना मृत्यूच्या खाईत ढकलल्यामुळे त्यांच्यावर अवलंबून असलेली अनेक घरे उद्ध्वस्त झालेली आहेत. दुर्दैवाने या बॉम्बस्फोटातील हल्लेखोरांचा तपास अद्यापपर्यंत लागू शकलेला नाही. बॉम्बस्फोटाची मालिका या मुंबईसाठी नवीन नाही. गेली दहा वर्षे दर दोन वर्षांनी किंवा एखाद्या वेळी किमान सहा महिन्यांनी अशा प्रकारचे बॉम्बस्फोटाचे धक्के या मुंबई शहराला बसत आहेत. मुंबई शहर हे या राज्याची औद्योगिक राजधानी आहे. आता हे मुंबई शहर अतिरेक्यांचे टारगेट झालेले आहे. या मुंबई शहरात आतापर्यंत झालेल्या बॉम्बस्फोटाचा सामना मुंबईकरांनी धैर्याने केलेला असताना त्यांच्यावर पुन्हा एकदा दिनांक 13 जुलै रोजी बॉम्बस्फोटाच्या मालिकेला सामोरे जाण्याची वेळ यावी, हा नियतीचा क्रूर खेळ आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी या सभागृहाच्या माननीय नेत्यांनी सांगितलेले आहे की, मृत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना आणि जखमी झालेल्या व्यक्तींना महाराष्ट्र शासनाच्या वतीने आणि केंद्र शासनाच्या वतीने काही मदत जाहीर केलेली आहे. ती मदत त्यांना लवकर मिळाली पाहिजे. पण अशा प्रकारे केवळ पैशांची मदत करुन भागणार नाही तर त्यांचे संसार पुन्हा एकदा उभे

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

राहिले पाहिजेत आणि त्यांचे पुनर्वसन झाले पाहिजे, अशा पध्दतीने त्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहण्याची आज गरज आहे. दिनांक 13 जुलै रोजी मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटात जखमी झ ालेल्या व्यक्तींच्या औषधोपचाराची दखल घेऊन त्यांच्या औषधोपचाराची शासनाने जबाबदारी घेतलेली आहे. परंतु या पूर्वीचे अनुभव फार वाईट आहेत. या पूर्वीचे वाईट अनुभव लक्षात घेता पुन्हा मागच्या सारखी गत होऊ नये, या कडे शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे, असे मला वाटते. या बॉम्बस्फोटात जे लोक मृत्युमुखी पडलेले आहेत त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, बॉम्बस्फोट झाल्यानंतर मुंबई शहरातील जनता, सर्व रुग्णालयातील डॉक्टर्स व नर्सेस, समाजसेवी संस्था ज्या पध्दतीने पुढे आल्या, शेकडो माणसे पुढे आली, शेकडो मदतीचे हात या जखमींना मदत करण्यासाठी पुढे आले आणि त्यांनी या जखमींना मदतीचा हात दिला, त्यामुळे मुंबईचे जनजीवन सावरण्यासाठी एक दिवसाचाही वेळ लागला नाही. खरे म्हणजे अशा पध्दतीने मुंबईला धक्के बसत असताना मुंबईचा माणूस हे धक्के सदैव आपल्या छातीवर पेलत आहे आणि धैर्याने त्याचा मुकाबला करीत आहे, याची दखल या सभागृहाने घेतली पाहिजे. मला असे वाटते की, शासनाच्या वतीने, या सभागृहाच्या वतीने पुन्हा एकदा मुंबईच्या जनतेला "आपण एकटे नाहीत" अशा प्रकारचा संदेश देण्याची गरज आहे. या राज्याचे सरकार, या राज्यातील विरोधी पक्ष आणि सर्व राजकीय पक्ष आपल्या सोबत आहेत, अशा पध्दतीचा संदेश या सभागृहाच्या माध्यमातून मुंबईकरांपर्यंत पोहचला तर मला असे वाटते की, आज त्यांच्यामध्ये जे भीतीचे, दहशतीचे वातावरण आहे ते निघून जाण्यास मदत होईल. म्हणून मी जास्त न बोलता सर्व मृतात्म्यांना श्रध्दांजली अर्पण करतो. सभापती महोदय, आपण या ठिकाणी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाला मी पाठिंबा देतो आणि माझे भाषण संपवितो.

-----

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात )

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : सभापती तालिका नामनिर्देशित करणे

**सभापती** : मी महाराष्ट्र विधान परिषद नियमातील नियम 8(1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो :-

(1) श्री. मोहन जोशी

(2) श्री. रमेश शेंडगे

(3) श्री. परशुराम उपरकर

(4) श्री. भगवानराव साळुंखे

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 26 जुलै, 2011 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 15 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 26 जुलै, 2011 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही